म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
वा. नं. ७५

आवु - १३८

नं १३८ २१/ ९।।९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पु. नांव - हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा

ले. चितळे पं० रामचंद्र

विषय निबंध - (क्र. १३८)

१३८

हिंदुस्थानची राष्ट्रीयसभा

निबंध

म. ग्रं, सं, ठाणें,
विषय निबंध
क्र. नं. २०१०

॥ श्री. ॥

वा. नि. 2010

# हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा.

अनु. 137

माहे जून सन १८८९.

रखेच मानीत असून त्यांनीं इकडे सुरू केलेल्या राज्यपध्दतीमुळें स
र्वांस सुखदुःखाचा सारखाच अनुभव येत आहे. या शिवाय राष्ट्रीयऐ
क्य होण्यास अवश्य लागणाऱ्या बऱ्याच गोष्टी हल्लीं अनुकूल असल
मुळें आमच्यांतील पूर्वींचा परकेपणा हळूहळू नाहिंसा होत आहे, आ
णि आपणां सर्वांचें राजकीय हिताहित एकच असून आपण सर्व
हिंदुस्थानचीं मुलें आहों असें सर्वांस पूर्णपणें वाटूं लागलें आहे.

मानवी प्राण्यांची उत्पत्ति होऊन त्यांची संख्या जसजशी वाढूं ला
गली तसतसे त्यांचे समाज बनले. अशा समाजापासून उत्पन्न होणा
ऱ्या नडी व त्रास यांचा परिहार होण्यासाठीं कांहीं उपाय काढावा अ
सा समाजांस वाटलें तेव्हां त्यांनीं आपल्या पैकींच एक चांगला मनुष्य
मुख्य करून त्याच्या सांगण्या प्रमाणें सर्व समाजानें वागावें असें ठर
लें, परंतु पुढें तो मुख्य मनुष्य शिरजोर होऊन वाटेल तसा वागूं लागल
मुळें समाजास पुनः त्रास होऊं लागला; तेव्हां एकाच्याच हातीं सत्ता ठेव
णें सुखकारक नाहीं असें त्यांस वाटलें व त्यांनीं दुसरीच व्यवस्था के
ली. अशातऱ्हेनें ज्या व्यवस्थेपासून समाजास अधिक अधिक सुख हो
त गेलें त्या त्या व्यवस्था लोकांनीं सुरू केल्या, व जी पासून समाजास
णजे [illegible]स अत्यंत सुख होऊं लागलें त्याच राज्यव्यवस्थेचा फैलाव
चोहोंकडे झाला. हल्लीं अशातऱ्हेनें सुधारलेली व प्रजेस सुख देणारी
ज्यव्यवस्था ज्या ज्या देशांत चालू आहे त्या पैकींच आमच्या राज्यक
र्त्यांचा इंग्लंड हा देश आहे. या इंग्लंडच्या राज्यकर्त्यांच्या हातीं आप
ल्या हिंदुस्थानची राज्यव्यवस्था असल्यामुळें त्यांनीं तिकडील राज्यव्य
वस्थेच्या मूल तत्वांस अनुसरूनच इकडेही राज्यव्यवस्था सुरू केली



आहे पण तिकडील राज्यकर्त्यांवर प्रजेचा दाब असल्यामुळें प्रजेचें म्ह
णणें ऐकून घेऊन तदनुरूप त्यांस वागावें लागतें. तसा प्रकार इकडे मु
ळींच नाहीं. इकडील राज्यकर्त्यांवर प्रजेचें वजन नसल्यामुळें तिच्या म्ह
णण्याची पर्वा न करितां इकडील अधिकारी स्वैच्छरीतीनें वागतात व
म्हणूनच प्रजासुख हा जो राज्यव्यवस्थेचा मूळ उद्देश त्याचें हिंदुस्थानां
त अगदीं मातेरें उडून जातें.

आपल्या देशाची जी स्थिति आहे ती चांगली कीं वाईट आहे, वा
ईट असल्यास ती सुधारण्यास व लोकांस पोटभर अन्न व अंगभर व
स्त्र मिळण्यास काय केलें पाहिजे, आपल्याला कोण कोणते व कशा
प्रकारचे कायदे पाहिजे आहेत, आपल्या काय काय अडचणी आहे
त व त्या कशानें दूर होतील इत्यादि गोष्टींची खरी माहिती परकीय
राज्यकर्त्यांस व्हावी तशी होणार नाहीं, व यदाकदाचित झाली तरी
स्वहितामुळें योग्य ते उपाय त्यांच्या हातून होणार नाहींत. आपल्या
घरांत काय अडचण आहे व तीमुळें आपलें किती नुकसान होत आ
हे, हें ज्याचें त्यास जसें कळेल व ती अडचण दूर व्हावी म्हणून ज्या
चा तोच जसा उपाय काढील तसा परक्यास काढितां येणार नाहीं
हें उघड आहे म्हणून ज्या देशावर परकीयांचा अंमल आहे त्या दे
शांत त्या परकी राज्यकर्त्यांनीं राज्यकारभार करित असतां तेथील
प्रजेचें म्हणणें ऐकून न घेतां तिच्या हिताहिताची कोणचीही गोष्ट
करणें हें न्यायानें होणार नाहीं व त्यापासून अर्थातच प्रजेस सुख
होणार नाहीं ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. तेव्हां हिंदुस्थानांतील ह
ल्लींच्या राज्यव्यवस्थेपासून प्रजासुख हा जो इंग्रजी राज्यव्यवस्थेचा

मुख्य उद्देश तो सिध्दीस जात नाहीं याचें कारण इकडे येऊन आम्हांवर राज्य करणारे परकी व परधर्मी अधिकारी, लोकमतास मुळींच मान देत नाहींत व आपल्या मर्जीप्रमाणें वागतात हें होय.

या प्रमाणें राज्यकारभारांत लोकमतास मान नसल्यामुळें हिंदुस्थानास कशी दशा प्राप्त झाली आहे व लोकांस किती अडचणी सोसाव्या लागत आहेत या संबंधानें विचार करूं लागलें असतां कदम असें दिसून येईल कीं, आपले कायदे करण्याचे कामीं लोक तांचा वस्तुतः उपयोग होत नसल्यामुळें वाटेल तसे कायदे व त्यांच वाटेल तसा अंमल आपल्यावर होत आहे, हिंदुस्थानच्या जमाखर्च च्या व्यवस्थेवर प्रजेचा दाब नसल्यामुळें उधळपट्टीचा खर्च होत आहे, नवी जमा काढण्यासाठीं करांची संमृध्दि झाली आहे व वरचेवर जें काढण्याचा सपाटा चालूच आहे तरी जमाखर्चाची तोंड मिळव कशी ती होत नाहीं; म्हणून मिठा साररव्या अत्यंत उपयोगी व गुरां आणि माणसांची शक्ति वाढविणाऱ्या पदार्थावर ही कर बसवून तो महाग करून टाकिला, व पुढें अशीच स्थिति कायम राहिली तर वा पाण्यावर देखील कर घेण्याची सरकारास पाळी येईल कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. अशा तऱ्हेची शोचनीय स्थिति हिंदुस्थान देशास येणें हें येथील प्रजा व राज्यकर्ते या उभयतांसही कारक नाहीं हें कोणीही सांगू शकेल. ही स्थिति नाहिंशी व्हावी इकडील राज्यव्यवस्थेंत असलेल्या उणिवा काढून टाकून ती राजा प्रजा या उभयतांसही सुखदायक व्हावी म्हणून प्रजेनें कायदेशीर व म्य मार्गाचें अवलंबन करून यत्नकरणें हें तिचें कर्तव्य आहे



या प्रमाणें प्रजेनें आपलें कर्तव्य बजाविण्याचा कायदेशीर उपाय म्हटला म्हणजे, खुद्द महाराणी सरकारच्या १८५८ सालच्या जाहीरनाम्या वरून हिंदुस्थानच्या प्रजेस जे हक्क प्राप्त झाले आहेत आणि राणीसरकारच्या प्रतिनिधींनीं प्रजेस वेळोवेळ जीं आश्वासनें दिलीं आहेत त्या प्रमाणें इकडील राज्यव्यवस्था आहे कीं नाहीं हें पहाणें, व नसल्यास ते हक्क आणि तीं आश्वासनें यांस अनुसरून इकडील राज्यव्यवस्था ठेवण्यास जेणेंकरून सरकारास भाग पडेल असे प्रजेनें यत्न करणें, हा होय. हे यत्न सफळ होण्यासाठीं हिंदुस्थानवासी सर्व साधारण लोकांचें ऐक्य होऊन लोकमत प्रबळ झालें पाहिजे, व त्याच्या वजनानें राज्यकर्त्यांचे ठायीं प्रजाहित करण्याची बुध्दि उत्पन्न केली पाहिजे. आजपर्यंत आपली दाद लागावी म्हणून लोकांनीं जे यत्न केले ते स्थाइक व राष्ट्रीय नसल्यामुळें त्यांजपासून हवा तसा उपयोग झाला नाहीं, पण हल्लीं राजकीय गोष्टींत सर्व देशभर गिला होऊन सर्व हिंदुस्थानचें लोकमत प्रबळ व्हावें व त्याचा इकडील अधिकारीमंडळीवर दाब रहावा म्हणून हिंदुस्थानचें कल्याण चिंतणाऱ्या विद्वान समंजस व प्रमुख लोकांनीं जे उद्योग सुरू केले आहेत, त्यांतीलच 'हिंदुस्थानची राष्ट्रीयसभा' हा एक फार महत्वाचा उद्योग होय.

आपल्या इकडे पूर्वी जशी गांवपंचाइत असे त्याच नमुन्यावर ही राष्ट्रपंचाइत ऊर्फ राष्ट्रीयसभा स्थापन केली आहे. ही सभा प्रतिवर्षी दिसेंबर महिन्याच्या अखेरीस पूर्वी निश्चित केलेल्या हिंदुस्थानांतील कोणत्या तरी मोठ्या शहरीं भरते, व त्यावेळीं सर्व हिंदुस्थानांतो

ल मोठ मोठ्या शहरचे व प्रांताचे निरनिराळ्या जातींचे लोक आपल्य
पैकीं प्रमुख व जाणते असे मुखत्यार निवडून पाठवितात, ते त्या श
हरीं एकत्र जमून आपल्या देशाच्या गरजांची, सुखदुःखांची, व रा
जकीय हिताहिताच्या गोष्टींची वांटाघाट करून एक निश्चय ठर
वितात व तो प्रमाणभूतपणें व राजनिष्ठापूर्वक सरकारापुढें ठेवितात.
या सभेमध्यें जातिधर्मभेदाचा यत्किंचितही संबंध मनांत न आणितां
हिंदु, मुसलमान, पार्शी, युरोपियन, ख्रिस्ती वगैरे सर्व जातीचे व धर्मांचे
लोक आपणा सर्वांचें राजकीय हिताहित एकच आहे, व राजकीय दृ
ष्टीनें आपण सर्व एकाच हिंदुस्थानचीं मुलें आहों असें समजून ऐक
भावानें वागतात. या राष्ट्रीयसभेच्या आजपर्यंत चार सभा झाल्या. पहिल
सभा १८८५ त मुंबईस झाली. या सभेस सारे ७८ लोक जमले होत
अध्यक्षस्थानीं कलकत्याचे प्रसिध्द बाबू डब्ल्यू. सी. बानर्जी हे होते. दु
सरी सभा कलकत्यास १८८६ त झाली. या सभेस ठिकठिकाणचे ४३६
मुखत्यार आले होते व मुंबईचे प्रसिध्द पार्शी गृहस्थ मि. दादाभाई
नौरोजी हे अध्यक्ष होते. ही सभा हिंदुस्थानच्या राजधानींत झाल्यामु
ळे त्या वेळच्या हिंदुस्थानांतील गव्हरनर जनरलांनीं कित्येक मुखत्यारांस
मेजवानी दिली व अध्यक्षांची स्वतंत्रपणें गांठ घेऊन त्यांच्याशीं पु
ष्कळ वेळ भाषण केलें. तिसरी सभा १८८७ त मद्रास येथें भरली ह
ती. या सभेचे अध्यक्ष मुंबईचे प्रसिध्द मुसलमान बारिस्टर मि. ब
द्रुद्दीन तय्यबजी हे होते. या सभेस सर्व हिंदुस्थानांतून ६०४ मुखत्या
र आले होते. या मुखत्यारांचें मद्रासच्या गव्हरनरांनीं चांगलें आगतस्वा
गत करून त्यांस मेजवानीही दिली. चवथी राष्ट्रीयसभा गतवर्षी अ



लाहाबाद येथें भरली होती त्या वेळीं तर सर्व ठिकाणचे निरनिराळ्या
जातिधर्मांचे १४०० हून जास्त मुखत्यार जमले होते व त्यांनीं कलक
त्याचे प्रसिध्द युरोपियन व्यापारी मि. यूल साहेब यांस अध्यक्ष केलें
होतें. ही राष्ट्रीयसभा पहाण्या साठीं विलायतेहून पार्लमेन्ट सभेचे कां
हीं सभासद मुद्दाम इकडे आले होते. त्यांनीं ही सभा पाहून फार आ
नंद प्रदर्शित केला व या उद्योगाची स्तुति केली.

ही राष्ट्रीयसभेची आजपर्यंतची हकीगत वाचली म्हणजे ही सभा
लोकांस किती आवडूं लागली आहे व तिचें महत्व दिवसानुदिवस
येथें व विलायतेंत कसें वाढत चाललें आहे हें कोणासही सहज दिसू
न येईल. राष्ट्रीयसभे मार्फत ज्या गोष्टी सरकारच्या कानीं जातात त्यां
कडे जर हिंदुस्थान सरकारानें लक्ष दिलें नाहीं तर दूरउच्या राज्यक
र्त्यांचे खरे यजमान जे विलायतेंतील लोक व त्यांची पार्लमेन्ट सभा,
त्यांच्याकडून आमच्या सरकारची कानउघाडणी व्हावी, तिकडील लो
कांस हिंदुस्थानच्या खऱ्या स्थितीची माहिती करून द्यावी, व राष्ट्री
यसभेचें महत्व वाढवून हिंदुस्थानच्या संबंधानें विलायतेंतील लोकां
स आपलें कर्तव्य बजाविण्यास लावावें वगैरे उद्देशानें विलायतेंत
एक उद्योग आमच्या लोकांनीं चालू केला आहे; हा उद्योग म्हणजे
'इंडियन पोलिटिकल एजन्सी' या नांवाची हिंदुस्थान संबंधानें राजकीय
गोष्टींचा विचार करणारी एक मंडळी तिकडे स्थापन केली आहे हा हो
य. या मंडळीचा उद्योग तिच्या उद्देशा प्रमाणें तिकडे फार जारीनें चालू
आहे. हिचे सेक्रेटरी मि. डिग्बी नांवाचे हिंदुस्थानची खरी स्थिति जाणणा
रे उद्योगी गृहस्थ आहेत.

आजपर्यंत राष्ट्रीय सभेनें आपल्यासाठीं काय काय केलें तें आ- तां पाहूं. हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलांची सुधारणा करून त्यांत लोकनियुक्त सभासद निदान निम्मे तरी असावे, जमाखर्चाच्या अंदाज संबंधीं कौन्सिलांत वादविवाद व्हावा, व सभासदांस लागणाऱ्या माहि तीच्या संबंधानें अधिकाऱ्यांस प्रश्न विचारून त्यांचीं उत्तरें मिळावीं असा अधिकार कौन्सिलच्या सभासदांस असावा. राणी सरकारांनीं हिंदु स्थानचें राज्य आपल्या ताब्यांत घेतल्यापासून इकडील रयतेच्या त कारी काय आहेत त्या ऐकून त्यांची चौकशी झाली नाहीं, ती होण्या साठीं नेटिव व युरोपियन यांची एक मंडळी नेमावी. हिंदुस्थानांतील मोठ्या हुद्यांच्या जागा मिळण्याची पात्रता येण्यासाठीं जी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा विलायतेस होते, तिच्या वयाची यत्ता कमी केल्यामुळें इकडील लोकांस ती परीक्षा देण्याची बहुतेक बंदी झाल्या प्रमाणेंच हे म्हणून ती परीक्षा विलायते प्रमाणें इकडे व्हावी व वयाची यत्ता वर्धिवी करावी. तसेंच अबकारी खात्यापासून होत असलेला अनीति सार दूर करावा, पोलीस खात्यांत सुधारणा करावी, देशी कारागिरीस मालास उत्तेजन द्यावें, रयतेस लष्करी व धंदेशिक्षण मिळण्याची सो करावी आणि हत्यारें बाळगण्याची व आपखुषीनें लढाईवर जाण्याची वानगी मिळावी, न्याय चांगला मिळावा म्हणून ज्युरीची पध्दत सर्वत्र रू करून, न्यायदेणें व अंमलबजावणी करणें हे अधिकार एकाच मनुष्या हातीं देऊं नयेत, तसेंच जंगलच्या कायद्यापासून होत असलेली पीडा दूर रावी, भातीवरील व मिठावरील कर कमी करावे, वगैरे सूचना राष्ट्रीय सरकारास केल्या आहेत.



राष्ट्रीयसभेनें आपल्या हिताकरितां म्हणून ज्या सूचना केल्या आहेत प्रमाणें आजच सर्व गोष्टी घडून येणें दुरापास्त आहे, तरी त्या सूचनांचा हळू हळू विचार होऊन त्या अमलांत येतील अशी सबळ आशा आहे. परवां कायदे कौन्सिलांत गव्हरनर जनरलांनीं जें भाषण केलें त्यावरून आपल्या राष्ट्रीयसभेनें केलेल्या सूचनेप्रमाणें कायदे कौन्सिलांची सुधारणा होण्यास विलंब लागणार नाहीं असें कोणासही दिसून येईल. हिंदुस्थानचे कैवारी पार्लमेन्ट सभेचे सभासद मि॰ ब्राडला यानीं विलायतेंत जी खटप- ट चालविली आहे त्यावरून आमच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठीं लव- करच एक मंडळी पार्लमेंट सभेमार्फत नेमली जाईल असें वाटत आहे. सिव्हिल सर्व्हिस परीक्षेच्या बाबतींत मागें नेमिलेल्या कमिशनचा रिपोर्ट विलायतेस विचारासाठीं गेला आहे. त्या रिपोर्टांतील आम्हांस बाधक अशा कित्येक गोष्टींच्या संबंधानें विलायतेंतील आमच्या राजकीय मं- डळीचे सेक्रेटरी मि॰ डिग्बी याणीं पुष्कळ खटपट करून स्टेट सेक्रेटरी बरोबर पत्रव्यवहार सुरू केला आहे, व त्यापासून आपलें पुष्कळ हित झाल्या शिवाय रहाणार नाहीं. तसेंच राष्ट्रीयसभा पहाण्यासाठीं व अब- कारी खात्याची माहिती मिळविण्या साठीं मि॰ केन नांवाचे जे पार्लमेंटमेंबर इकडे येऊन गेले त्यांच्या खटपटीनें अबकारी खात्या संबंधानें पार्लमेंट सभेंत वादविवाद होऊन हिंदुस्थान सरकारची अबकारी खात्याची व्यव- स्था बरोबर नसल्यामुळें अनीतिप्रसार वाढत चालला आहे याचा लव- कर बंदोबस्त व्हावा अशा आशयाचा नुक्ताच बहुमतानें पार्लमेन्टस- भेनें ठराव केला आहे, व त्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारला बंदोबस्त केल्या शिवाय गत्यंतरच नाहीं. या प्रमाणें आपली दाद लागून राष्ट्रीय

सभेच्या म्हणण्या प्रमाणें ३।४ गोष्टी जरी सत्वर घडून आल्या तरी रा
ष्ट्रीयसभे प्रीत्यर्थ आजपर्यंत केलेल्या खटपटींचें व खर्चाचें बरेंच
ज झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

राष्ट्रीयसभेपासून हिंदुस्थानांतील सर्व लोकांस होणारे लाभ ह
ल्लीं कां होईनात पण तूर्त या उद्योगापासून लोकांच्या मनांतील औ
दासिन्य नाहिसें होऊन त्यांचे ठायीं एक प्रकारची जागृति किंवा चे
वळ उत्पन्न झाली आहे व त्यामुळें राष्ट्र या नात्यानें आजपर्यंत मृ
वत् भासणारे आपले लोक सजीवसे दिसूं लागले आहेत, त्यांचे ठा
राष्ट्रीय ऐक्य करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे आणि स्वार्थत्याग
ध्दि, स्वदेशभक्ति व बंधुप्रीति वगैरे सद्गुणांचा उदय लोकांमध्यें झा
आहे. हे लाभ सांप्रतकाळीं कमी महत्वाचे आहेत असें कोणाही
री मनुष्यास वाटणार नाहीं. या शिवाय कालांतरानें राष्ट्रीय सभेनें
विलेल्या गोष्टी घडून आल्या म्हणजे हल्लीं प्रमाणें वाटेल तसे कायदे
णार नाहींत, साहेब लोकां प्रमाणें मोठ मोठ्या हुद्याच्या जागा आप
स मिळतील, उधळपट्टीचा खर्च होणार नाहीं, मीठ, इन्कमट्याक्स
सारखे कर बसणार नाहींत, न्याय मनसुब्याची उत्तम व्यवस्था होई
राज्यव्यवस्थेंतील आपल्याला नापसंत असणारीं व्यंगें दूर होतील, त
र्थ लोकमतप्राधान्य राज्यव्यवस्थेच्या सुखांचा अनुभव आपणास
घेऊं लागून आपल्या देशाची भरभराटी होईल.

या प्रमाणें महत्वाचे व हिंदुस्थानच्या खऱ्या कल्याणाचे लाभ
राष्ट्रीय सभेपासून हल्लीं होत आहेत व पुढें होणार आहेत ती किती
जनदार बलवान् व चिरस्थाई झाली पाहिजे बरें? अद्यापि तिची



देशाच असल्यामुळें तिचें लहानपणचें बाळसें कायम राहून तिला नि-
रोगी व पाणीदार बनविणें सर्वस्वी तिला जन्मदेणाऱ्या राष्ट्राच्या म्ह-
णजे हिंदुस्थानवासी सर्व लोकांच्या हातीं आहे. या राष्ट्रीयसभे पासून
होणाऱ्या लाभांचा परिणाम जें हिंदुस्थानचें राजकीय हित तें एकाच
व्यक्तीचें किंवा एकाच जातीचें होणार नसून हिंदुस्थानांत रहाणाऱ्या
सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांचें होणार आहे म्हणून तें साधण्या
करितां सर्वांनीं एक दिलानें व एक जुटीनें वागलें पाहिजे, व राष्ट्रीयस-
भा चिरकाल रहावी म्हणून त्यांनीं या सत्कृत्यासाठीं आपलें तन, मन,
धन अर्पण केलें पाहिजे. राष्ट्रीय सभा चिरस्थाई करण्याचें मुख्य साध-
न जो पैसा तो जमा करून 'राष्ट्रीय फंड' उभारण्याचें काम श्रीमान्
विद्वान्, अविद्वान्, व्यापारी, कारागीर, इनामदार, जमीनदार, जहागी-
रदार, शेतकरी, मजूर वगैरे सर्व प्रकारच्या सर्व जातींच्या लोकांचें
आहे, तें त्यानीं केलें पाहिजे. तसेंच या सभेचें वजन वाढण्याचें मु-
ख्य साधन म्हटलें म्हणजे राष्ट्रीयसभा म्हणजे काय, ती काय करिते,
तिजपासून आपलें किती हित होणार आहे वगैरेची माहिती सर्व रयते-
स करून देऊन तिची अनुकूलता करून घ्यावयाची हें होय. हें काम फा-
र नाजूक आहे म्हणून तें शहाण्या लोकांनींच आपल्याकडे घेतलें पा-
हिजे. यंदांची राष्ट्रीय सभा आपल्या इलाख्यांत मुंबई शहरीं होणार
आहे, तिच्या साठीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून व शहरांतू-
न निरनिराळ्या जातींचे व धर्मांचे दोन हजारांहून ही जास्त मुखत्या-
र येण्याचा संभव आहे. तेव्हां या प्रचंड सभेचा खर्च भागविण्याची,
या [illegible]ष्ट्रीयसभेची मुंबई इलाख्यांतील सर्व लोकांस माहिती करून

देण्याची मोठी जबाबदारी इलाख्यांतील प्रत्येक देशहितेच्छू गृहस्थाव
आहे ती त्यानें आळस टाकून मोठ्या उमेदीनें बजाविली पाहिजे.

मित्र हो, आपला उद्देश, आपलें भाषण आणि आपली वृ
त्ति यांत नेहमीं मेळ ठेऊन राष्ट्रीयसभा चिरस्थाई होण्यासाठीं पै
सा जमविण्याचें काम व ती वजनदार होऊन तिचें महत्व वाढा
म्हणून तिची माहिती सर्व लोकांस करून देण्याचें काम तुम्हीं दृ
निश्चयानें सत्वर सुरू करा. सतत परिश्रमा शिवाय कोणत्या
कामांत यश मिळत नाहीं, आणि उद्योग केल्या शिवाय परमे
र कोणास मदत करीत नाहीं हें पूर्णपणें लक्षांत बाळगा आ
उत्साहपूर्वक उद्योग व सतत परिश्रम करण्याचा दृढ संकल्प
रून आपापल्या कामाला लागा म्हणजे परमेश्वर तुम्हास सि
देईल, तुमच्या जन्मभूमीचें कल्याण होईल आणि तुमच्या
न्माचें सार्थक्य होईल.

---

आपल्या दयाळू महाराणी सरकारांनीं सन १८५८ सालीं जो जाहीरनामा हिंदुस्थानांत प्रसिध्द केला त्यांत खालीं लिहिलेलीं कलमें आहेत:-

"आमच्या इतर सर्व रयते विषयीं जे राजधर्म आम्हीं अवश्य मानितों तेच राजधर्म हिंदुस्थानांतील आमच्या मुलुखांतल्या रयते विषयीं आम्हास पाळिले पाहिजेत असें आम्हीं समजतों; व ईश्वरकृपेनें ते सर्व आम्हीं इमानें इतबारें पाळूं."

"आणखीं आमची अशी इच्छा आहे कीं, आमच्या रयतलोकांपैकीं जे कोणी विद्येनें, हुशारीनें व प्रामाणिकपणानें जीं जीं सरकारी कामें यथास्थित चालविण्यास लायख असतील, तीं तीं कामें त्या लोकांस सवड असेल त्या प्रमाणें बिन दिक्कत व निःपक्षपातानें ज्ञात किंवा धर्म मनांत न आणितां द्यावीं."

हा जाहीरनामा म्हणजे राजाकडून रयतेस मिळालेल्या हक्कांची एक सनदच आहे. ह्या जाहीरनाम्यास अनुसरूनच सन १८७७ सालीं राणीसरकारांनीं 'हिंदुस्थानची बादशाहीण' ही पदवी घेतल्याबद्दलचा दिल्लीस बडा दरबार झाला तेव्हां राणीसरकारचे प्रतिनिधी नामदार लार्ड लिटन याणीं भाषण केलें. पुढें सन १८८७ त राणीसरकारच्या जुबिली महोत्सवाचे वेळीं नामदार लार्ड डफरीन याणीं ही असेंच भाषण केलें. या शिवाय नामदार लार्ड नार्थब्रुक, लार्ड रिपन, मि० ग्लाडस्टन [illegible] सद्दी मंडळीनें वेळोवेळ आमच्या लाजरवीच्या वगैरे संबं[illegible]
हे प्रकार, हीं भाषणें व हीं राणीसरका[illegible]
लागल्या जागींच कायम रहातात व त्या[illegible]

भारांत आम्हांस अनुभव येत नाहीं, म्हणूनच राष्ट्रीयसभा स्थापन केली आहे, व तिच्या मार्फत आपलीं वचनें सरकारानें पाळावीं म्हणून त्यास जागें करावें एवढाच या सभेच्या उत्पादकांचा हेतु आहे, तो परमेश्वर सफळ करो. शेवटीं आमच्या चक्रवर्तिनी महाराणी सरकारांनीं उदार मनानें आपणांस जीं वचनें दिलीं आहेत तीं पाळण्याची सद्बुद्धि त्यांच्या विलायतेंतील व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांस परमेश्वरानें देऊन खुद्द राणीसरकारांस चिरायु व सुखी करावें असें त्याजपाशीं सर्वांचें मागणें आहे.

---

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
वा. नं. ७५

अनु-१३७

नं १३७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु. नांव - हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा
ले. - चिपळूणकर पं० रामचंद्र
विषय - निबंध - (क्र १३७)

१३७

# हिंदुस्थानची राष्ट्रीयसभा

निबंध